# ई - पोलीस पत्रिका

दि.०२/०१/२०२३ अनु.क्र.०१

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१. पोआअ/आस्था-२/नावात बदल/१४६७९ /२०२२ अमरावती शहर दि.०९/१२/२०२२**

# आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील कार्यरत असलेले खालील नमुद पोलीस अंमलदार यांच्या विनंती अर्जा वरुन तसेच त्यांनी सारद केलेल्या कागदपत्राच्या आधारे नविन नावाची नोंद शासकीय अभिलेखा मध्ये सुधारणा करण्याची मंजरी देत आहे.

| अनु.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव/नेमणुक | सेवापटा मध्ये नमुद असलेले नाव | सेवापट मध्ये नावात बदल करावयाची विनंती | पुरावा दाखल जोडलेली कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १. | मपोशि/८२१ रिना विनोद तांबे नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर | रिना विनोद तांबे | रिना दिवाकर मेन | १.महाराष्ट्र शासन राजपत्र अंक ओ (३९) गुरुवार ते बुधवार, सप्टे.२९ - ऑक्टोबर ५, २०२२. २. सेवापटाची छायांकित प्रत. |

**२. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोशि-१७०५ परतेती/१५२२३/२०२२ अमरावती शहर दि.२९/१२/२०२२**

-----

**संदर्भ :-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/पोशि-१७०५ परतेती/१२७२६/२०२२ अमरावती शहर, दिनांक १२/१०/२०२२

**कसुरदारचे नाव :-** पोशि/१७०५ गजानन किसनराव परतेती, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोशि/१७०५ गजानन किसनराव परतेती, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे दिनांक ०४/०६/२०२२ रोजी रात्री २०.०० वा. पासुन सकाळी ०८.०० वा. पावेतो हद्दीमध्ये पेट्रोलींग डयुटीकरीता सी.आर. १ मोबाईल वरील चालक पोशि/२००२ वसीम खान, नेमणुक मोटर परिवहन विभाग अमरावती आणि पोलीस मुख्यालय येथील तुम्ही असे दोघाचे कर्तव्य नेमण्यात आले होते. दिनांक ०४/०७/२०२२ रोजी रात्री दरम्यान सी.आर.१ मोबाईल वरील चालक पोशि/२००२ वसीम खान यांनी पोलीस स्टेशनला हजर येवुन नाईट अधिकारी पोहेका/१०१५ योगेश यांना माहिती दिली की, सी.आर.-१ मोबाईल मध्ये नेमण्यात आलेले पोशि/१७०५ गजानन किसनराव परतेती हे दारू पिवुन असुन त्यास एमडीटी डिव्हाईसवर योग्यरित्या बोलता येत नाही. अशी माहिती नाईट अधिकारी यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना दिली असता वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी त्यांना आदेश दिले की, डयुटीवरील पोशि/१७०५ गजानन परतेकी, नेमणुक पोलीस

मुख्यालय, अमरावती शहर यांचा दारू पिली असल्याने दारु पिण्याबाबत वैदयकीय तपासणी करावी असे सुचित केले. नंतर वरिष्ठ पोलीस अधिकारी स्वत:पोलीस स्टेशन ला हजर आले असता सी आर मोबाईल वरील तुम्ही अंधाराचा फायदा घेवुन जिप गाडी मधुन कोणाला काही न सांगता तुमच्या ताब्यातील एमडीटी डिव्हाईस गाडी मध्येच ठेवुन निघुन गेलेले आढळुन आले. तुम्ही गैहरजर असल्याने तुमची गैरहजेरी बाबत स्टे.डा.नोंद घेवुन पो.स्टे.ला तपास मदत असलेले पोशि/१७३७ अमोल मोहोड यांना सी आर १ मोबाईल वर नेमण्यात आले. याबाबत नियंत्रण कक्ष येथे माहिती दिली. तुम्हाला अति महत्वाचे रात्री दरम्यानचे पेट्रोलींग कर्तव्यावर नेमण्यात आले असता तुम्ही दारू पिलेल्या अवस्थेत कर्तव्यावर आढळुन आले. तुम्ही दारु पिवुन कर्तव्यावर आले असल्यामुळे तुमची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती मिळताच तुम्ही अंधाराचा फायदा घेवुन जीप गाडीमध्ये एमडीटी डीव्हाईस ठेवुन न सांगता पळुन गेले असल्याचे आढळुन आले. तुमच्या अशा कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा मलीन झाली आहे. तुम्ही तुमच्या कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीस तुम्ही दिनांक १५/१०/२०२२ रोजी स्विकारली असुन त्यावर तुम्ही तुमचे आजपावेतो स्पष्टीकरण सादर केलेले नाही. यावरुन तुम्हास देण्यात आलेली शिक्षा मान्य आहे असे गृहीत धरुन कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे शिक्षेबाबत अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

उपरोक्त नमुद कसुरदार यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **"देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**३. पोआअ/विचौ-२/कसुरी/कर्तव्यावर गैरहजर/पोशि-६०२ वायझाडे/१५२३२ /२०२२ अमरावती शहर दि.२९/१२/२०२२**

## आदेश

पोशि/६०२ गोपाल वायझाडे, पोलीस स्टेशन बडनेरा, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर येथील हवालात (लॉकअप) गार्ड दिनांक ०४/०६/२०२२ रोजी कर्तव्यार नेमण्यात आले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन, राजापेठ यांनी दिनांक ०४/०६/२०२२ रोजीचे १३.५९ वाजता पोलीस स्टेशन राजापेठ चे लॉकअप चेक केले असता. त्यामध्ये ०४ (चार) आरोपी हवालात बंद असल्याचे दिसुन आले. तसेच हवालात गार्ड येथे एक संत्री पोहवा/९७० गोकुल पवार, नेमणुक

पोलीस स्टेशन नांदगाव पेठ हे हजर मिळाले. त्या व्यतिरीक्त हवालात गार्ड वरील इंचार्ज सपोउपनि/२४ राजेश डाहाके, नेमणुक पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा व तुम्ही हवालात गार्ड कर्तव्यावर गैरहजर असल्याचे दिसुन आले. तरी तुम्ही तुमच्या कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे. त्यामुळे तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस